९२.२०
२.११.२०२१
आ.क्र.

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

---

**दिनांक : ०२ नोव्हेंबर, २०२१**

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

**विषय :- दिपावली उत्सव २०२१ संदर्भात सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
**३) महाराष्ट्र शासन, अधिसुचना, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई, दि. १३ मार्च, २०२०**
**४) महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. DMU-२०२०/C.R.९२/DisM-१, दि. ४ जून, २०२१, दि.१७ जून, २०२१,दि. २५ जून, २०२१**
**५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.कोरोना २०२१/ सी.आर.३६६/आरोग्य-५ दिनांक २४ सप्टेंबर, २०२१**
**६) शासन परिपत्रक .क्र.आरएलपी-१०२१/प्र.क्र.२४७/विशा-१ब दि.२७/१०/२०२१**

ज्या अर्थी, सध्या जगभरात पसरलेल्या कोरोना विषाणूची लागण राज्यातील काही भागात झाली आहे. सदर रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने राज्यभर अनेक प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (COVID-१९) प्रार्दुभाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्या अर्थी, वरील अधिनियम व नियमानुसार साथरोग अधिनियमाच्या खंड २(१) नुसार महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी घोषित करून त्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे घोषित करण्यात आले आहे.

ज्या अर्थी कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता यावर्षी दि २ ते ६ नोव्हेंबर, २०२१ दरम्यान दिपावली उत्सव साजरा करण्यात येत आहे. कोविड रोगाचा प्रादुर्भाव विचारात घेऊन गेल्या दीड वर्षापासून सर्व धर्मीय सण/उत्सव अत्यंत साध्या पध्दतीने व लोकांनी एकत्रित न येता साजरे केले आहेत कोरोनाची दुसरी लाट ओसरली असली तरी अजूनही कोरोनाचा धोका कायम आहे. त्यामुळे नागरिकांनी मोठया प्रमाणात एकत्र येऊन गर्दी करुन उत्सव साजरा करणे उचित होणार नाही. उत्सव साजरा करताना सर्व नागरीकांनी आरोग्याच्या दृष्टीकोनातून योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

**त्याअर्थी, साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७ च्या कलम २ अन्वये, तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या सर्व संबंधित तरतुदींसह प्राप्त अधिकारांचा वापर करुन आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे दिपावली उत्सव २०२१ बाबत संदर्भ क्र. ६ मधील शासन परिपत्रकातील अटी व शर्ती उल्हासनगर महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक २ ते ६ नोव्हेंबर, २०२१ पर्यंत जसेच्या तसे लागु करीत आहे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.**

१. कोवीड-१९ च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महाष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचे परिपत्रक क्र.DMU/२०२०/CR ९२/DisM-१ दि.४/६/२०२१, सार्वजनिक आरोग्य विभाग आदेश क्र.No.Corona २०२१/C.R.३६६/Arogya-५,दि.११/८/२०२१ तसेच आदेश क्र. No. Corona २०२१/- C.R.३६६/ Arogya-५ दि.२४/९/२०२१ अन्वये "ब्रेक द चेन" अंतर्गत दिलेल्या सुधारित मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत पालन करावे.

२. कोव्हीड १९ या विषाणूचा प्रादुर्भावर रोखण्यासाठी शासनाने, महापालिका व पोलीस प्रशासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजुन काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

(पुढील पानावर)

उक्त आदेशाची सर्व संबंधितांनी तात्काळ अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० कलम, १८८ मधील तरतुदीनुसार दंडनीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मा. डॉ.राजा दयानिधी (भा.प्र.से) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी शहरवासीयांना केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका